**प्रेस नोट** **दि.०३/०८/२०१९**

## स्वारगेट पोलीस स्टेशन,पुणे शहर

## बंद फ्लॅटमध्ये अडकलेल्या महिलेचे प्राण वाचविले बाबत

दि.२९/०७/२०१९ रोजी पोलीस उप निरीक्षक श्री.जीवन बोरसे, स्वारगेट पोलीस स्टेशन, पुणे हे दैनंदीन कर्तव्यावर येत असताना, श्री.अशोक कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्वारगेट पोलीस स्टेशन, पुणे यांनी पोउपनिरी बोरसे यांना फोनव्दारे कळविले की, मीरा सोसायटी, पुनावाला गार्डन, येथे फ्लॅट नं.२४, बि.नं.२ येथे लवकर पोचा महत्वाचा कॉल आहे. त्याप्रमाणे पोउपनिरी बोरसे सदर ठिकाणी पोचले असता, त्यांना कळाले की, महिला नामे परविन अन्वर सत्तार, रा.फ्लॅट नं.२४, बि.नं.२, मीरा सोसायटी, पुनावाला गार्डन, पुणे ह्या नेहमी सकाळी ०७.०० वा बाहेर पडतात, पण आज रोजी बाहेर पडलेल्या नाहीत. तसेच त्यांनी सकाळ पासुन फ्लॅटचा दरवाजाही उघडला नाही, तसेच त्या फोनही उचलत नाहीत. तसेच पोउपनिरी बोरसे यांनी फ्लॅटचा दरवाजा वाजविला असता, त्यांनी आतुन काही प्रति सादर दिला नाही. सदर ठिकाणी महर्षी नगर मार्शलचे पोलीस शिपाई ९८९२ फुंदे व पोलीस शिपाई १०२९३ रणसिंग, तसेच दामिनी मार्शलचे महीला पोलीस शिपाई रणसिंग व भालेराव असे आले होते. सदर फ्लॅटमध्ये प्रवेश करणे करीता फायर ब्रिगेड बोलविण्यात आली होती. परंतु सदर फायर ब्रिगेडचे गाडीला ट्रफिकमुळे येण्यास वेळ लागत असलेने, पोउपनिरी बोरसे व स्टाफने सदर फ्लॅटचा दरवाजा तोडुन आत प्रवेश केला असता, महिला नामे परविन अन्वर सत्तार ह्या बेडरुममधील बाथरुम समोर बेशुद्ध अवस्थे्त मिळुन आल्याने, तात्काळ ॲम्ब्युलन्स बोलावुन, त्यांना उपचारकामी जहांगीर हॉस्पीटल येथे पुढील उपचारकामी ॲडमिट केले. पोलीस उप निरीक्षक श्री.बोरसे व महर्षी नगर मार्शलचे पोलीस शिपाई ९८९२ फुंदे व पोलीस शिपाई १०२९३ रणसिंग, तसेच दामिनी मार्शलचे महीला पोलीस शिपाई रणसिंग व भालेराव यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे महिला नामे परविन अन्वर सत्तार यांचा जीव वाचला. सदर महिलेची नातेवाईक भाची नामे समीना मोलुभाऊ सिराज शेख यांनी एपस्थित पोलीस कर्मचारी यांचे आभार मानले.

(अशोक कदम)
वरीष्ठ पोलीस निरीक्षक
स्वारगेट पोलीस ठाणे,पुणे शहर